जनसंपर्क कक्ष
01 JUL 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या पूरस्थितीवर कार्यशाळा

**त. भा. प्रतिनिधी**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल व शाश्वतता अध्ययन केंद्र, अक्वास्फिअर क्लब आणि सिग्मा इन्फ्राप्लॅन इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि.२ रोजी पूर परिस्थिती मॉडेलिंग विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळा सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणार असून देशभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी, अभियंते, जलसंपदा तज्ज्ञ तसेच भू-अवकाशीय तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी ती उपयुक्त ठरणार आहे. हवामान बदल, अतिवृष्टी आणि वाढते शहरीकरण यांमुळे पूर परिस्थितीचे स्वरूप दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीचे होत आहे. संभाव्य पूरग्रस्त क्षेत्रांचा अंदाज घेणे, पूर व्यवस्थापनाचे प्रभावी नियोजन करणे आणि आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक बनले आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत पूर परिस्थितीचे वैज्ञानिक विश्लेषण, नदी प्रवाहाचे संगणकीय अनुकरण, पूर क्षेत्रांचे नकाशीकरण आणि पूर व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली जाणार आहे.

कार्यशाळेत विनामूल्य प्रवेश असुन पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. कार्यशाळेचे स्वरूप प्रात्यक्षिक व प्रत्यक्ष प्रशिक्षणावर आधारित असल्याने जागा मर्यादित आहेत. त्यामुळे इच्छुकांनी लवकरात लवकर नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन कार्यशाळेचे संयोजक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
01 JUL 2026


वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# विद्यार्थीसंख्या वाढीसाठी गुणवत्ता आणि विश्वासार्हता आवश्यक : डॉ. विलास शिंदे

**कोल्हापूर : (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

विद्यार्थीसंख्या वाढीसाठी गुणवत्ता आणि विश्वासार्हता आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ८९ अभ्यासकेंद्रांतील समन्वयक व लेखनिकांसाठी आयोजित कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या कार्यशाळेत कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे स्वागत करताना संचालक डॉ. कृष्णा पाटील. सोबत अभिजीत रेडेकर आणि विनय शिंदे.

यावेळी संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर, उपकुलसचिव डॉ. प्रल्हाद जाखले, सिस्टीम प्रोग्रामर शशी हुक्केरी, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर तसेच विविध अभ्यासकेंद्रांचे समन्वयक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील समन्वयक व सहायक प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सन २०३५ पर्यंत उच्च शिक्षण संस्थांमध्ये व्यापक बदल अपेक्षित आहेत. गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या संस्था अधिक स्वायत्त होतील, तर गुणवत्ता निकष पूर्ण न करणाऱ्या संस्थांबाबतही आवश्यक निर्णय घेतले जातील. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने गुणवत्तावृद्धीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. विद्यापीठाकडून विविध शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची पडताळणी केली जाणार असून गुणवत्तेचे मूल्यमापनही करण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक शैक्षणिक वातावरणात चांगले विद्यार्थी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक घडविणे ही काळाची गरज आहे. विना-अनुदानित संस्था, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि विविध विद्यापीठांमधील वाढती स्पर्धा यामुळे विद्यार्थ्यांच्या संख्येवर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर संस्थांनी शैक्षणिक गुणवत्ता, विश्वासार्हता आणि लौकिक वृद्धिंगत करण्यावर भर देणे आवश्यक आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अभ्यासकेंद्रांमार्फत अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाच्या संधी पोहोचविण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर यांनी ऑनलाईन शिक्षण व्यवस्थेतील तांत्रिक प्रगतीचा आढावा घेताना सांगितले की, विद्यापीठाच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये सातत्याने नवे मॉड्यूल्स आणि सुविधा विकसित करण्यात येत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि विद्यार्थी-केंद्रित व्यवस्था निर्माण करण्यासाठी संगणक केंद्र प्रयत्नशील आहे. तसेच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत नव्याने अभ्यासकेंद्र सुरू करणाऱ्या शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालय, मिरज, व्यंकटराव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आजरा तसेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुंभारी (जि. सांगली) यांच्या समन्वयकांचा कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रारंभी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सातारा विभागीय केंद्राचे समन्वयक डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले, तर उपकुलसचिव विनय शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क क
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

01 JUL 2026

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609

# स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये २७ जूनला अभियांत्रिकी प्रवेशाबाबत मार्गदर्शन

**कोल्हापूर : (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण होऊन अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या वतीने ऑनलाईन मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेबाबत २७ जून रोजी मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रामध्ये विद्यार्थी व पालकांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसंदर्भात संपूर्ण माहिती देण्यात येणार असून नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ई-स्क्रुटिनी, मेरिट लिस्ट, ऑप्शन फॉर्म भरण्याची पद्धत, प्रवेशाच्या विविध फेऱ्या, महाविद्यालय व शाखा निवडीचे निकष, शुल्क संरचना तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. सध्याच्या स्पर्धात्मक वातावरणात योग्य माहितीच्या अभावामुळे अनेक विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत अडचणींना सामोरे जातात. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेले हे चर्चासत्र विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून त्यांना त्यांच्या गुणांनुसार आणि आवडीनुसार योग्य महाविद्यालय व शाखा निवडण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. तसेच प्रवेश प्रक्रियेत होणाऱ्या सामान्य चुका टाळण्याच्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे आहे.

चर्चासत्रात स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल समन्वयक डॉ. गणेश पाटील मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती स्कूलचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी दिली.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) येथे शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हे मार्गदर्शन चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. अभियांत्रिकी प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी व पालकांनी या चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

0 1 JUL 2026 सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मोत्यांच्या शेतीसाठीच्या अभिनव टाकीच्या डिझाईनला पेटंट

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाने विकसित केलेल्या 'गोड्या पाण्यातील मोती शेतीसाठीच्या टाकीच्या डिझाईन'ला नुकतेच भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. 'प्रयोगशाळेपासून शेतीपर्यंत' या प्रकारचे संशोधन करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्रज्ञांना हे यश मिळाले आहे.










विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. नितीन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करणाऱ्या साक्षी श्रीकांत ढेकणे, विशाल संभाजी सुतार आणि दिलीप आनंदराव कांबळे यांच्या संशोधनकार्याचे हे फलित आहे.

भारतामध्ये गोड्या पाण्यातील मोती शेतीला मोठी संधी उपलब्ध असून, त्यासाठी आवश्यक असलेले नियंत्रित आणि नैसर्गिक वातावरण निर्माण करणे हे मोठे आव्हान मानले जाते. शिवाजी विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी प्राणीशास्त्र अधिविभागात गोड्या पाण्यातील मोत्यांच्या शेतीचा प्रकल्प हाती घेऊन तो प्रमाणाबाहेर यशस्वी करून दाखविला आहे. आता या प्रकल्पाअंतर्गत विविध बाबींचा सूक्ष्म अभ्यास करून हा प्रयोग अधिकाधिक यशस्वी करण्याच्या दृष्टीने संशोधनाची दिशा केंद्रित केली आहे. याचाच भाग म्हणून या संशोधकांनी मोत्यांच्या शेतीसाठी आवश्यक अशा वैज्ञानिक निकषांनुसार दोन परस्पर जोडलेल्या टाक्यांची अभिनव रचना विकसित केली आहे.

### टाकीची रचना व महत्त्व

या टाकीच्या डिझाईनमध्ये दोन वेगवेगळ्या आकारांच्या परस्पर जोडलेल्या टाक्यांचा समावेश आहे. पहिल्या टाकीतील सबमर्सिबल पंपाद्वारे पाणी दुसऱ्या टाकीत सतत प्रवाहित केले जाते. दुसऱ्या टाकीत विशेष पाईपलाइन आणि स्प्रिंकलर प्रणाली बसविण्यात आली असून त्यामुळे पाण्यात नैसर्गिक नदीप्रवाहासारख्या लहरी निर्माण होतात. छतावरील स्प्रिंकलर्समधून नियंत्रित वेगाने होणारा पाण्याचा शिडकावा कृत्रिम पावसासारखे वातावरण तयार करतो. या अखंड जलपरिभ्रमणामुळे पाण्यातील विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण, तापमान, पीएच



आणि एकूण पाण्याची गुणवत्ता दीर्घकाळ संतुलित राहते. परिणामी मोती उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या शिंपल्यांना नैसर्गिक अधिवासासारखे पोषक वातावरण उपलब्ध होते. या अभिनव टाकीच्या माध्यमातून एकदाच भरलेले पाणी १५ ते १८ महिन्यांपर्यंत गुणवत्तेत कोणताही लक्षणीय बदल न होता वापरणे शक्य झाल्याचे या संशोधनातून सिद्ध झाले आहे. ही रचना केवळ मोती शेतीसाठीच नव्हे, तर संशोधन, शिक्षण, जैवविविधता संवर्धन आणि कृषीपूरक उद्योगांसाठीही उपयुक्त ठरणार आहे.

प्राणीशास्त्र अधिविभागात विकसित झालेल्या या तंत्रज्ञानामुळे भविष्यात शेतकरी, संशोधक तसेच लघु व मोठ्या उद्योजकांना मोती उत्पादनाचा पर्यायी व्यवसाय विकसित करण्यासाठी मोठी मदत होणार आहे. यासाठी अधिविभागाची संशोधक विद्यार्थिनी साक्षी ढेकणे हिने भुवनेश्वर (ओडिशा) येथील आयसीएआर-सीआयएफए (सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर फ्रेशवॉटर एक्वाकल्चर) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षणही घेतले आहे.

### 'कृषीपूरक उद्योग म्हणून विकासाची क्षमता'

या संदर्भात डॉ. नितीन कांबळे यांनी सांगितले की, या पेटंटमुळे शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाधारित तंत्रज्ञान विकसित करण्याच्या क्षमतेची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे. हे संशोधन भविष्यात तंत्रज्ञान हस्तांतरण (Technology Transfer) आणि व्यावसायिकीकरणासाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पारंपरिक शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गोड्या पाण्यातील मोती शेतीकडे शेतकरी वळू शकतात. कमी देखभाल खर्च, कमी वीज वापर आणि नियंत्रित जलव्यवस्थापनामुळे हे तंत्रज्ञान ग्रामीण भागात रोजगार व उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त ठरण्याची क्षमता आहे.

### 'लॅब टू लँड' संकल्पनेला मूर्त रूप देणारे संशोधन: कुलगुरू डॉ. कामत

या संदर्भात संशोधकांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले की, शिवाजी विद्यापीठात समाजोपयोगी आणि उद्योगाभिमुख संशोधनाला सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे. या पेटंटमुळे संशोधनाचे रूपांतर प्रत्यक्ष तंत्रज्ञानात करण्याच्या आमच्या प्रयत्नांना बळ मिळाले असून, शेतकरी व उद्योजकांसाठी नवीन संधी उपलब्ध होतील. संशोधन, नवोपक्रम आणि समाजोपयोगी तंत्रज्ञान विकासाच्या दिशेने शिवाजी विद्यापीठाने टाकलेले हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल असून, 'प्रयोगशाळेतील संशोधन ते शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारे हे पेटंट आहे.

0 1 JUL 2026

सकाळ

# शिक्षणशास्त्र विभागात बी.एस्सी., बी.एड. प्रवेश समुपदेशन

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात शनिवारी चार वर्षीय एकात्मिक बी.एस्सी. व बी.एड. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात समुपदेशन सत्र झाले. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी अभ्यासक्रमाचे महत्त्व, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत या अभ्यासक्रमाची उपयुक्तता, आदींबाबत मार्गदर्शन केले.

सकाळ

# पूरपरिस्थिती मॉडेलिंगवर उद्या कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल व शाश्वतता अध्ययन केंद्र, अक्वास्फिअर क्लब आणि सिग्मा इन्फ्राप्लॅन इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेडतर्फे पूर परिस्थिती मॉडेलिंगवरील या विषयावर गुरुवारी (ता. २ जुलै) राष्ट्रीय कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळा सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत होणार आहे. त्यात सहभागी होणाऱ्यांना

एचईसी-आरएएस या आंतरराष्ट्रीय स्तरावर वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून वनडी आणि टूडी पूर परिस्थिती मॉडेलिंगचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे.

01 JUL 2026
लोकमत

# बी.एड्. प्रवेश प्रक्रियेवर समुपदेशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात चार वर्षीय एकात्मिक बी.एस्सी.-बी.एड्. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात ऑनलाइन समुपदेशन सत्र घेण्यात आले. अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत या अभ्यासक्रमाचे महत्त्व, करिअरच्या संधी तसेच 'कमवा व शिका', एनएसएस, एनसीसी आणि क्रीडा उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले. अभ्यासक्रम समन्वयक डॉ. रुपाली संकपाळ यांनी प्रवेश प्रक्रिया, पात्रता, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज, शुल्क, वसतिगृह सुविधा आणि गुणवत्ता यादीबाबत माहिती देत प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना आवश्यक सहकार्य केले जाईल, अशी माहिती दिली.

0 1 JUL 2026
पुढारी

# 'दूरशिक्षण' केंद्राच्या प्रवेशाची १० जुलैपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेची १० जुलैपर्यंत मुदत आहे. बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसह ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. केंद्राच्या ८९ अभ्यास केंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील माहिती उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर जाऊन प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.